## इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट प्रणित "समन्वयीत कृषी विकास प्रकल्प".

**प्रस्तावना -**

पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा, वर्धा, वाशिम व यवतमाळ या ६ जिल्हयांमध्ये कृषीक्षेत्रामध्ये शासनामार्फत सध्या राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांमध्येच समन्वय साधून कृषिविकास.

**प्रकल्पाचे लाभार्थी :-**

सुमारे १२०० गावांचा सहभाग, गावांचा 'मृद आणि जलसंधारण' तसेच सेंद्रिय शेतीच्या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग, प्रत्येक गावातील २५० ते ३०० कुटूंबांना विविध योजना / सुविधा तसेच लघु आणि मध्यम प्रकल्प / उद्योगांचे प्रशिक्षण, गायींच्या प्रजातींचा विकास, पणन, कृषियेतर कामे, महिलांचे स्वयंसहाय्यता गट इ. व्दारे दारिद्रय रेषेखालील अनुसुचीत जाती, जमाती व अल्प व अत्यल्प भुधारक व भूमिहीन कुटूंबांना लाभ, प्रकल्प क्षेत्रातील एकूण सुमारे ३ लाख कुटूंबांना व सुमारे २० लाख लोकांना या प्रकल्पाचा फायदा.

**प्रकल्पाचा मुख्य उद्देश :-**

घटलेले कृषि उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांमध्ये योगदान देऊन, प्रकल्प क्षेत्रातील कुटुंबांचा, शाश्वत व वैविध्यपूर्ण उत्पन्नांच्या स्त्रोतांसह, कृषि व कृषियेतर उत्पन्नाच्या साधनांव्दारे विकास करणे; त्याचप्रमाणे उत्पादनातील व बाजारपेठीय जोखीमींमुळे दारिद्रय वा नैराश्याच्या परिस्थितीत न जाता, कुटुंबांमध्ये या जोखीमींना तोंड देण्याची क्षमता निर्माण करुन कुटुंबांना पूर्वीच्या सुस्थितीत पुर्नस्थापित करणे.

**प्रकल्पाची उद्दिष्टये :-**

(१) वैविध्यपूर्ण शेती आणि कृषियेतर उत्पन्नाच्या साधनांव्दारे कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ करणे,

(२) सेंद्रिय शेती व किमान निविष्ठांची कंत्राटी शेतीपध्दती अवलंबून कृषि विकास करणे,

(३) कृषि उत्पादनांची प्राथमिक प्रक्रिया, त्यांची गुणवत्तावाढ आणि मालाची विक्री व्यवस्था इ. बाबतीत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे,

(४) सूक्ष्म-वित्तपुरवठा (मायक्रो-फायनान्स) आणि अतिलघु-उद्योगाव्दारे महिला सक्षमीकरण,

(५) शासनाचे सर्व स्त्रोत आणि योजनांमध्ये समन्वय साधणे.

**प्रकल्पातील सहभागी विभाग :-**

- सहकार व पणन विभाग - समन्वयक
- कृषी व पदुम विभाग
- ग्राम विकास व जलसं धारण विभाग
- महिला व बालविकास विभाग
- वित्त व नियोजन विभाग

**प्रकल्पाचे प्रमुख घटक :-**

**(१) विविध खाजगी, सेवाभावी व शासकीय संस्थांमध्ये भागिदारी निर्मिती आणि या संस्थांचा क्षमता विकास**

- सहा जिल्ह्यातील ८३५१ गावांपैकी १२०० गावांमध्ये १०, गावांचा एक गट
- याप्रमाणे शेती आधारीत १२० उपप्रकल्पांची (end to end project) निर्मिती,
- विविध खाजगी, सेवाभावी व शासकीय संस्थांच्या सहकार्याने सदर संस्थांमध्ये भागीदारी निर्मिती, संस्थांचा क्षमता विकास.

- २,८६,८०० कुटुंबियांना लाभ त्यापैकी ९०,००० भुमीहीन कुटुंबास लाभ.
- प्रस्तावित तरतूद रुपये ११.११ कोटी.

**(२) उत्पादनापासून पणन व्यवस्थेपर्यंत बाजार-जाळयांव्दारे समन्वय साधणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन -**

**(अ) गरीब शेतक-यांच्या हिताच्या 'बाजार-जाळयांची' व 'मूल्य-साखळींची' निर्मीती करणे :**

- समतोल व शोषणरहित बाजारपेठ निर्मिती आणि विशिष्ट पिकांकरिता (कापूस, सोयाबीन, फळे-फुले, भाज्या इ.) 'मूल्य-साखळी' निर्मिती,
- १२० ॲग्री-बिझनेस क्लस्टर्सची निर्मिती,
- विशिष्ट २० पिकांसाठी कंत्राटी शेती,
- शेतमाल तारण ठेवण्याकरिता गोदांमाच्या उपलब्धतेद्वारे 'ग्रामीण गोदाम व्यवस्थेचे' बळकटीकरण
- प्रस्तावित तरतूद रुपये ७०.८५ कोटी.

**(ब) शाश्वत शेती :**

- 'मूळ-स्थळी ' जलसंधारण : १२०० गावांमध्ये 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत' समतल व ढाळीच्या बांधांच्या निर्मितीद्वारे 'मूळ-स्थळी' जलसंधारण, ३६०० गाव तलावांची निर्मिती.
- स्थानिक देशी गायींच्या प्रजातींचा विकास : १२०० गावांकरिता ६० गोपैदास केंद्रांचे बळकटीकरण, स्थानिक देशी गायींच्या प्रजातींच्या विकासाद्वारे ६२,५०० कालवडींची पैदास, ४५ दुग्धसंकलन केंद्रांची त्याचप्रमाणे २० ते २५ गावांकरिता पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाकरिता मार्गदर्शन केंद्रांची उभारणी व बळकटीकरण.
- शाश्वत / सेंद्रिय शेतीचा विकास : किमान ५० हजार हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय शेती कार्यक्रम, किमान ३५ हजार हेक्टर क्षेत्रात अन्नधान्य पिकांचे उत्पादन घेणार. कंत्राटी शेतीचा सेंद्रिय कापूस उत्पादन आधारीत विकास
- प्रस्तावित तरतूद रुपये २८२.६६ कोटी.

**(क) शेतीआधारीत अतिलघु आणि लहान व मध्यम प्रकल्प/उद्योगांची उभारणी :**

- ४००० हेक्टर क्षेत्रावर आवळा, शेवगा, संत्र्याची लागवड,
- प्रायोगिक तत्वावर ५०० हेक्टर क्षेत्रावर जैव-इंधन पिकांची आणि गोड मका पिकाची लागवड,
- प्रत्येक उपप्रकल्पात शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग वा व्यापार प्रकल्प,
- १२० विविध संस्थांशी संपर्क साधून या प्रकल्पांकरिता पणन व्यवस्था निर्मिती.
- प्रस्तावित तरतूद रुपये ८७.७३ कोटी.

**(३) महिलांचे सक्षमीकरण आणि कुटुंबांमध्ये पूर्वीच्या सुस्थितीमध्ये पुर्नस्थापित होण्याची क्षमता निर्माण करणे :**

- ९,००० महिला बचतगटांच्या स्थापनेतून स्थानिक महिलांचे संघटन व बचतगटाद्वारे महिलांचा क्षमता विकास.
- प्रत्येक २०० महिला स्वयं सहाय्यता गटाकरीता एक लोकसंचलीत साधन केन्द्र.

- केन्द्रासाठी सुक्ष्म वित्तपुरवठ्याद्वारे उभारण्याचे प्रस्तवित.
- प्रस्तावित तरतूद रुपये २९.०६ कोटी.

**(४) प्रकल्पाचे व्यवस्थापन :**

- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे येंथे 'प्रकल्प सहाय्य केंद्र',
- अतिरीक्त अमरावती विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली 'प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा',
- सहा जिल्ह्यांच्या मुख्यालयी 'आत्मा' च्या अधिपत्याखाली 'प्रकल्प व्यवस्थापन मंडळ'.
- सर रतन टाटा ट्रस्ट यांचे आर्थिक योगदान. आय.टी.सी., टाटा केमिकल्स, अरविंद मिल्स, जयंत मिल्स, प्राज इंडस्ट्रिज, रिलायन्स, बँका, नाबार्ड, नागरी सहकारी बँका तसेच नामांकित स्वयंसेवी संस्थांचा सहभाग.
- प्रस्तावित तरतूद रुपये ३०.६२ कोटी.

**प्रकल्पाचे फायदे :-**

(१) पीक उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ,

(२) सध्याच्या अन्नधान्य तसेच कापूस उत्पादनात वाढ होऊन एकूण शेतीच्या उत्पन्नामध्ये २५% ते ३५ % वाढ,

(३) पीक उत्पादन किंमतीमध्ये मोठया प्रमाणात घट,

(४) 'लघुत्तम बाहय-निविष्ठा शाश्वत शेतीपध्दतीव्दारे' (LEISA) २०% ते २५% अधिक उत्पन्नवाढ,

(५) 'मूळ-स्थळी ' जलसंधारणामुळे व विशिष्ट गावांमध्ये पीकांच्या लागवडी विषयक घेतलेल्या विविध प्रात्यक्षिकांमुळे पीक उत्पादन वाढ.

(६) शेत जमिनींची घटणारी धूप, जलसंधारणामुळे वाहून जाणाऱ्या पाण्यामध्ये होणारी घट, तसेच जमिनीत झिरपलेल्या पाण्यामुळे वाढणारे भूजल आणि जमिनीतील सेंद्रीय पदार्थांची वाढणारी उपलब्धतता,

(७) कृषि क्षेत्र ३ वर्षात ५०,००० हेक्टर पासून ७ व्या वर्षापर्यन्त ४ लाख हेक्टर पर्यंत वाढविण्यात येणार.

(८) शेतीक्षेत्रातील सध्याची 'क्रॉपिंग ईन्टेन्सिटी' ११२% पर्यंत वाढ,

(९) ५० गोपैंदास केंद्रांचे बळकटीकरण आणि संपूर्ण प्रकल्प कालावधीत ६२,५०० कालवडींची पैंदास.

**प्रकल्पाची वित्तीय उभारणी :-**

| अ. क्र. | अर्थपुरवठादार | प्रकल्पाच्या Project Impelmentation Manual (PIM) नुसार | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | लाख अमेरिकन डॉलर्स | रुपये कोटी | |
| | | | | |
| १ | IFAD चे कर्ज | ४०१.०१ | १८८.४७ | ३३.८ % |
| २ | केंद्र शासन / राज्य शासनाचा प्रचलित योजनांव्दारे घेण्यात येणारा प्रकल्पातील हिस्सा | ३७६.०२ | १७६.७३ | ३१.७ % |
| ३ | IFAD अनुदान (Grant) | १०.०८ | ४.७४ | ०.८ % |
| ४ | सर रतन टाटा ट्रस्ट | १६०.०७ | ७५.२३ | १३.५ % |
| ५ | बँक | १४५.३९ | ६८.३३ | १२.३ % |
| ६ | खाजगी क्षेत्र | ५७.७९ | २७.१६ | ४.९ % |
| ७ | लाभार्थी | ३६.०९ | १६.९६ | ३.० % |
| | **एकूण** | **११८६.४५** | **५५७.६३** | **१०० %** |

**उपलब्ध निधिचा विनियोग : -**

| अ. क्र. | घटक | प्रकल्पाच्या Project Impelmentation Manual (PIM) नुसार | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | अपेक्षित खर्च लाख अमेरिकन डॉलर | रुपये कोटी | |
| १ | भागीदारी निर्मिती व क्षमता विकास | २३.६३ | ११.११ | २.० % |
| २ | शाश्वत शेती आणि बाजार-जाळे | | | |
| | अ. गरीबांच्या हिताचे बाजार-जाळे | (१४७.६१) | ६९.३८ | १२.४ % |
| | ब. शाश्वत शेती | (६०२.६०) | २८३.२२ | ५०.८ % |
| | क. अतिलघु आणि लहान व मध्यम उद्योग | (१८२.७८) | ८५.९१ | १५.४ % |
| ३ | महिला सक्षमीकरण आणि सुस्थितीमध्ये पुर्नस्थापित होण्याची क्षमता निर्मिती | ६३.८३ | ३०.०० | ५.४ % |
| ४ | प्रकल्प व्यवस्थापन | ६५.१४ | ३०.६२ | ५.५ % |
| ५ | आकस्मिक खर्च | १००.८२ | ४७.३९ | ८.५ % |
| **एकूण** | | **११८६.४१** | **५५७.६३** | **१००.० %** |

**टिप :** १) १ डॉलर = ४७ रुपये या प्रचलित दराने रुपयातील रक्कमा दर्शविलेल्या आहेत. २) सर्व रक्कमा नजिकच्या दशांश स्थानापर्यंत दर्शविलेल्या आहेत.

**प्रकल्पाचा घटनाक्रम व सद्यस्थिती -**

- दि. २५ जून, २००८ रोजी ईफाडचे शिष्टमंडळ मा. प्रधान सचिव, सहकार व पणन, म.रा. यांच्या समवेत मंत्रालय स्तरावर चर्चा.

- दि. २६ जून, २००८ रोजी प्रकल्पाविषयी मते जाणून घेण्यासाठी ईफाडच्या प्रतिनिधींची राज्यातील सहकारी संस्था, शासकीय विभाग, खाजगी क्षेत्र, बँक इं. च्या प्रतिनिधींसमवेत यशदा, पुणे येथे कार्यशाळा.

- दि. २८ जून ते ११ जुलै, २००८ दरम्यान ईफाडच्या प्रतिनिधींचा विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांचा दौरा.

- दि. २२ जुलै, २००८ रोजी ईफाड प्रतिनिधींच्या अभ्यासदौऱ्यांनंतर त्यांच्यामार्फत प्रकल्पाविषयी सहकारी संस्था, शासकीय विभागी, खाजगी क्षेत्र, बँक इ. च्या प्रतिनिधींसमोर सादरीकरण.

- या प्रक्रियेनंतर दि. २३ जुलै, २००८ ते दि. १० सप्टेंबर, २००८ दरम्यान प्रकल्पाविषयीचा Draft Report तयार करून शासनांस मान्यतेस्तव सादर.

- दि. १५ सप्टेंबर, २००८ रोजी प्रकल्पाच्या Draft Report बाबत मंत्रालयात चर्चा.

- दि. १९ सप्टेंबर, २००८ रोजी ईफाड, रोम कार्यालयाचे प्रतिनिधी श्री. माटीया व सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे प्रतिनिधींसमवेत मा. प्रधान सचिव, सहकार व पणन, म.रा. यांच्या समवेत मंत्रालय स्तरावर चर्चा.

- दि. १५ डिसेंबर व २६ डिसेंबर, २००८ रोजी प्रकल्पांतर्गत उपप्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी NGO, सहकारी संस्था, Public Trusts, Private Companies इ. कडून Expression of Interest (EOI) मागविण्यासाठी वृत्तपत्रामधे जाहीरात. त्यानुसार १०९ संस्थांकडून प्राप्त प्रस्तावांचे मा. प्रधान सचिव, सहकार व पणन यांच्या मार्गदर्शनानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीद्वारे छाननी करून त्यापैकी ५४ संस्थांचे प्रस्ताव पात्र ठरविण्यात आले.

- दि. ५ जानेवारी, २००९ रोजी प्रकल्प अहवालानुसार नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी नियुक्तीबाबत वृत्तपत्रांमधे जाहीरात प्रसिद्ध.

- सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार दिनांक १६ एप्रिल, २००९ रोजी रक्कम रू.२५/- लाख महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे प्राप्त झाली.

- दि. २० ते २२ एप्रिल, २००९ दरम्यान भारत सरकार, ईफाड, रोम कार्यालयाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र शासन यांच्यादरम्यान प्रकल्पासाठीचे Loan Negotiation प्रक्रिया पूर्ण करून भारत सरकार व ईफाड यांच्यादरम्यान करावयाच्या कराराच्या मसुद्यावर (Program Financing Agreement) स्वाक्षरी झाली. तसेच महाराष्ट्र शासन व ईफाड यांच्यादरम्यान करावयाच्या कराराच्या मसुद्यावर (Program Agreement) स्वाक्षरी झाली.

- प्राथमिक छाननीत पात्र ठरलेल्या संस्था, संबंधित जिल्हयांचे शासकीय अधिकारी यांच्याकरिता दि. २२ ते २५ जुलै, २००९ दरम्यान Producers' Company या विषयावर यशदा, पुणे येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

- दि. २९ जुलै २००९ रोजीच्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता .

- प्रकल्पाबाबत सविस्तर सूचना शासन निर्णय क्र. बासप्र २००८ / प्र. क्र. ४८ / २१-स, दिनांक १३/०८/२००९ मध्ये निर्गमित करण्यात आल्या.

- प्राथमिक छाननीत पात्र ठरलेल्या संस्था, संबंधित जिल्हयांचे शासकीय अधिकारी यांच्याकरिता दि. २२ ते २६ सप्टेंबर, २००९ दरम्यान प्रबोधिनी, अमरावती येथे प्रकल्पाबाबत व प्रकल्पांतर्गत प्रस्तावित उपप्रकल्पांच्या तयारीसाठी मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन सर रतन टाटा ट्रस्ट यांची संलग्न संस्था CInI यांच्यामार्फत करण्यात आले होते.

- शासना निर्णय क्र. बासप्र २००८/प्र.क्र.४८/२१-स दि. ०७ ऑक्टोबर, २००९ द्वारे Lead Program Agency (LPA) <u>प्रकल्प अग्रणी यंत्रणा</u> चे कामकाज महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे देण्यात आलेले आहे.

- शासन निर्णय क्र. बासप्र २००८/प्र.क्र.४८/२१-स दि. ०७ ऑक्टोबर, २००९ द्वारे

    - मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय प्रकल्प सुकाणू समिती (SPSC) ची स्थापना,

    - मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय प्रकल्प सुकाणू समिती (PSC) ची स्थापना,

    - प्रकल्पातील समाविष्ट जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय प्रकल्प समन्वय समिती (DPCC) ची स्थापना

- श्री. नवीन सोना, मा. अतिरीक्त विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे सदर प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक पदाचा अतिरीक्त भार सोपविण्यात आला आहे

- MSAMB पुणे येथे Project Support Unit (PSU) ची स्थापना

- Program Management Unit ((PMU) ची अमरावती येथे स्थापना

- PIM च्या निर्देशांनुसार PMU येथे आवश्यक असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची जाहीरात देऊन कंत्राटी पद्धतीवर नियुक्त्या

- प्रकल्पाच्या जिल्हास्तरीय District Project Management Team (DPMT) कार्यालयातील पदांच्या कंत्राटी पद्धतीवर भरतीसाठी जाहीरात देऊन अर्ज मागविण्यात आले होते. सदर अर्जदारांच्या दि.९-१० व ११ फेब्रुवारी, २०१० दरम्यान मा. प्रधान सचिव, सहकार व पणन यांच्या मान्यतेने गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर ईफाड व Project Implementation Manual यांच्यामार्फत देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार कंत्राटी पद्धतीने नियुक्तांचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच आवश्यक पदांकरिता उपलब्ध होऊ न शकलेल्या पदांसाठी पात्र उमेदवार मिळण्याकरिता वर्तमानपत्रांमधे पुनश्च जाहीरात प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

- सदर प्रकल्पामधील लेखाधिकारी ही पदे महाराष्ट्र राज्याच्या वित्त विभागातील अधिकाऱ्याच्या प्रतीनियुक्तीने भरण्याचे प्रस्तावित

- Project Management Unit (PMU) चे अमरावती येथे स्टेट बँक ऑफ इंडियामधे चालू खाते (Current Account) उघडण्यात आले आहे.

- District Project Monitoring Team (DPMT) चे अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, वर्धा व वाशिम या सहा जिल्ह्यांच्या ठिकाणी असे एकुण ६ खाते उघडण्याचे प्रस्तावित आहे.

- दि. ३० सप्टेंबर, २००९ रोजी सदर प्रकल्पाच्या करारावर भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून भारताचे इटलीमधील राजदूत व ईफाड यांचे अध्यक्ष यांची स्वाक्षरी

- प्रकल्प सुरू होण्या करिता ठरवून देण्यात आलेल्या सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर दि. ४ डिसेंबर, २००९ रोजी ईफाड मार्फत प्रकल्प कार्यावित झाला आहे.

- प्रकल्पाची मुदत-३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत असून कर्ज व अनुदानाची अंतिम तारीख- ३० जून, २०१८ आहे.

- दि. १६ नोव्हेंबर, २००९ रोजी प्रतिथयश १६ स्त्रोत (Resource) स्वयंसेवी संस्थांसाठी पुणे येथे उपप्रकल्प तयार करण्याबाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार सर्व १६ संस्थाकडून उपप्रकल्पाबाबत Concept Note सादर करण्यास कळविण्यात आले होते.

- दि. १९ डिसेंबर २००९ रोजी मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्पाच्या Program Steering Committee (PSC) ची बैठक आयोजित करण्यात आली.

- Annual Work Plan & Budget व Procurement Plan या संदर्भात मार्गदर्शनासाठी IFAD दिल्ली कार्यालयाचे अधिकाऱ्यांमार्फत दि. १८ व १९ जानेवारी, २०१० रोजी PMU अमरावती कार्यालयात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

- दि. ८ फेब्रुवारी, २०१० रोजी आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ या करिता अनुक्रमे रक्कम रू. २.८२ कोटी व रू.४६.४१ कोटी चे AWPB व Procurement Plan ईफाड यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहेत.

- शासन निर्णय क्र. बासप्र-२००९/प्रक्र.८८/२१स दि. ३०.०१.२०१० नुसार प्रकल्पाच्या आर्थिक वर्ष २००९-१० करिता रक्कम रू.३२० लाख उपलब्ध करून देण्यासंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले. त्यानुसार शासनाकडून रक्कम वर्ग करण्याकरिता कोषागार पुणे येथे पणन संचालनालयामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

- PMU अमरावती कार्यालयाकरिता निश्चित करण्यात आलेल्या सहकार संकुल, अमरावती इमारतीमधील सुमारे २५०० स्क्वेअर फूट जागा उपलब्ध करून घेणे व सदर जागेची कार्यालयाच्या अनुषंगाने आवश्यक डागडुजी व पार्टीशन्स करणे प्रस्तावित आहे. यासाठी येणारा खर्च प्रकल्पांतर्गत करता येणार नसल्याचे ईफाडचे अधिकाऱ्यांनी सूचित केले आहे. त्यासाठी सहकार कल्याण निधीमधून सदर खर्च केला जावा असा प्रस्ताव मा. सहकार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सहकार कल्याण निधीच्या दि. १८ फेब्रुवारी, २०१० च्या सभेमधे सादर करण्यात आला होता. सहकार कल्याण निधीकडे रक्कमेची उपलब्धता नसल्यामुळे सदर डागडुजीसाठी आवश्यक रक्कम रू. १७ लाख पणन मंडळामार्फत अग्रिम स्वरूपात उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. त्याबाबत सहकार कल्याण निधीकडून अंदाज पत्रक व अग्रिम मागणी प्रस्ताव या कार्यालयाकडे अद्याप प्राप्त व्हायचा आहे.

- प्रकल्पाचे लेखा परिक्षण करण्याकरिता प्रकल्प अहवालात नमूद केल्यानुसार लेखा परिक्षकाची नेमणूक करण्याकरिता Expression of Interest मागविण्याकरिता दि. २४ फेब्रुवारी, २०१० रोजी Indian Express या वृत्तपत्रात व पणन मंडळाच्या www.msamb.com या वेबसाईटवर जाहीरात प्रकाशित करण्यात आली.

- प्रतिथयश १६ स्त्रोत (Resource) स्वयंसेवी संस्थांना उपप्रकल्पाबाबत Concept Note सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यापैकी ८ संस्थाचे Concept Note सबप्रोजेक्ट कन्सेप्ट नोट छाननी समिती द्वारे पात्र ठरले आहेत. त्यानुसार End to End Sub Project चे Detailed Project Report २२ फेब्रुवारी २०१० पर्यंत सादर करण्यास सांगण्यात आले होते. त्यापैकी ६ Detailed Project Reports प्राप्त झाले आहेत.

- दि. १२ मार्च २०१० रोजी प्रकल्प सुकाणू समितीची बैठक प्रस्तावीत आहे.

***